**महाराष्ट्र शासन**

आयुक्त राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय

जुने जकात घर, दुसरा मजला, फोर्ट, मुंबई- ४०० ०२३.

विषय : मद्य निर्मितीसाठी काचेच्या बाटल्यांचा वापर करण्याबाबत.

**परिपत्रक**

************

क्रमांक : एफएलआर- ११२०१३/७५३/पाच (ब) मुंबई दि. ०७ फेब्रुवारी, २०१६.

यासोबत शासन निर्णय क्र. बीपीए-१०१३/प्र.क्र. १६८/राउशु-२ दि. ११ जानेवारी, २०१६ ची प्रत पाठविण्यात येत आहे. सदर शासन निर्णयानुसार पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी व शासनाच्या महसूलाचा विचार करुन राज्यातील देशी/ विदेशी मद्याच्या आवेष्टनांकरिता फक्त काचेच्या बाटल्या उपयोगात आणण्यास तसेच पेट (PET) व टेट्रा पॅकचा वापर करण्यास निर्बंध घालण्यात आलेले आहेत. शासन निर्णयातील सूचना ***दि. १ एप्रिल, २०१६*** पासून अंमलात येणार असून अंमलबजावणीचे दृष्टीने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. देशी /विदेशी मद्य निर्मितीसाठी यापुढे पेट बाटल्या व टेट्रा पॅकच्या वापरावर निर्बंध घालण्यात येत असून त्यांचा कोणत्याही परिस्थितीत वापर करता येणार नाही. परराज्यातून आयात होणाऱ्या पेय मद्याबाबत सुध्दा हेच निर्बंध लागू राहतील.

२. महाराष्ट्र मद्यार्क आसवन व पेय मद्य निर्मिती नियमावली, १९६६ मधील नियम १७ (२८) मधील तरतूदींनुसार स्पिरीटसच्या निर्मितीसाठी नवीन आणि महाराष्ट्र देशी मद्य नियमावली १९७३ मधील नियम ६ (२६) मधील तरतूदींनुसार स्वच्छ धुतलेल्या आवेष्टनाचा वापर करणे बंधनकारक आहे. या दोन्ही तरतूदींनुसार राज्यातील देशी/विदेशी मद्याच्या आवेष्टनांकरिता फक्त काचेच्या बाटल्या उपयोगात आणाव्यात. तसेच काचेच्या बाटल्यांवर "For Sale in Maharashtra State only" इंग्रजीत अथवा मराठीत "फक्त महाराष्ट्र राज्यात विक्रीकरिता" हे वाक्य बाटलीवर Emboss करणे बंधनकारक राहील. सदरचे Slogan प्रत्येक पॅक साईज प्रमाणे वाचनीय व सुस्पष्ट दिसेल अशा


...ce of the Superintendent
... State Excise, Nashik

| | |
|---|---|
| Inward No. | 7092 |
| Date | 10/2/2016 |

font size मध्ये काचेत उमटविणे emboss आवश्यक राहील. प्रचलित नियमातील तरतूदींनुसार स्पिरीटसच्या निर्मितीसाठी फक्त नवीन काचेच्या बाटल्या वापरणे बंधनकारक राहील.

३. बिअर, वाईन व देशी मद्य निर्माणी यांना उपरोक्त प्रमाणे त्यांच्याकडील काचेच्या बाटल्यांवर घोषवाक्य (Slogan) emboss केल्यानंतर नियमातील तरतूदींनुसार जुन्या बाटल्या वापरण्यास परवानगी राहील तथापी अशा बाटल्या स्वच्छ करण्याची कार्यपध्दती भारतीय मानके प्रमाणकाने (Bureau of Indian Standard- BIS) विहीत केलेल्या मानकानुसार अवलंबिणे बंधनकारक राहील.

४. बिअरसाठी कॅन वापर करण्यास कोणतेही निर्बंध राहणार नाहीत. तथापी पेट चा वापर करण्यास निर्बंध राहतील.

उपरोक्त निर्देशानुसार देशी व विदेशी मद्य निर्माण्यांनी दि. ३१ मार्च, २०१६ रोजी उत्पादीत केलेल्या पेट बाटल्यांचे व टेट्रा पॅकचे वितरण करण्यासाठी त्यांचेकडील साठा संपेपर्यंत किंवा दि. ३० जून, २०१६ पर्यंत यापैकी जे आधी येईल तोपर्यंत मुदत देण्यात येत आहे. तद्नंतर कोणत्याही परिस्थितीत पेट बाटल्यांचे किंवा टेट्रा पॅकचे वितरण करता येणार नाही. दि. १ एप्रिल, २०१६ रोजी घटकांकडे शिल्लक असलेल्या रिकाम्या पेट बाटल्या किंवा टेट्रा पॅकचा साठा प्रभारी अधिकारी यांनी ताब्यात घ्यावा. व त्याचा अहवाल या कार्यालयास अधीक्षकांमार्फत सादर करावा.

(विजय सिंघल)
आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

१. सर्व विभागीय उप-आयुक्त राज्य उत्पादन शुल्क,
२. सर्व अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक
३. सर्व देशी/विदेशी/बिआरएल मद्य निर्माणी (मार्फत अधीक्षक)
४. सर्व देशी/विदेशी /बिआरएल मद्य निर्माण्यावरील प्रभारी अधिकारी (मार्फत अधीक्षक)
५. या कार्यालयातील सर्व राजपत्रित अधिकारी.
६. अभिलेख शाखा (५ प्रती)